COSMOS IMPACT FACTOR 4.270


# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Refereed Journal

UGC Journal List No.64768 • Impact Factor 4.270


Pankaj Shaikshanik and Samajik Sanstha's

## Pankaj Kala Mahavidyalaya, Chopda

'B' Grade NAAC Accredited


Organizing

*One Day Interdisciplinary National Conference On*

# RECENT TRENDS IN HUMANITIES


Vol.No. 08 • Special Issue 10

March 2018 • ISSN No. 2230-9578


Editor

**Dr. Sambhaji Desai**

Principal

Sponsored by

North Maharashtra University, Jalgaon


Scanned with CamScanner

COSMOS
IMPACT FACTOR
4.270
UGC Journal List No. 64768

Vol.No. 08 Special Issue 10 March 2018 ISSN No. 2230-9578

Pankaj Shaikshanik and Samajik Sanstha's

# Pankaj Kala Mahavidyalaya, Chopda

'B' Grade NAAC Accredited

Organized

*One Day Interdisciplinary National Conference On*

# RECENT TRENDS IN HUMANITIES

**Board of Editors**

Prof. Sanjay K.Patil

Prof. Dilip Patil
Prof. Arun More
Prof. Deepak Deore
Prof. Shamsing Valvi
Prof. Dilip Girhe
Prof. Rahul Jadhav
Prof. Ajay Patil

Printed by

PRASHANT PUBLICATIONS

3, Pratap Nagar, Sant Dnyaneshwar Mandir Road, Near Nutan Maratha Mahavidyalaya, Jalgaon.
Website: www.prashantpublications.com Email: prashantpublication.jal@gmail.com
Ph: 0257-2235520, 2232800, 9665626717, 9421636460

All rights reserved. No part of this publication may be reproduced or transmitted in any form, or by any means, electronic or mechanical, including photo copying, recording, or nay Information storage and retrieval system, without permission in writing from copyright holder.

**Disclaimer:** The authors are solely responsible for the contents of the papers compiled in this volume. The publishers or editors do not take responsibility for the same in any manner. Errors if any are purely unintentional and readers are requested to communicate such error to the editors or publishers to avoid discrepancies in future.

Scanned with CamScanner

# - CONTENTS -

» Technology and Green Thrift ..........15
- Parvinder Khanuja
» Digital Payment System In India..........17
- Dr. Kanti Kiran David
» Macrophytes of Abana River in the perspectives of ..........20
Environmental issues and for its Management
- Shakun Mishra
» Impact Of Goods And Service Tax (GST) On Indian Agricultural Economy..........22
- Dr. Amar Watnani
- Varun Mahajan
» मार्क्सवादी व मुलगामी स्त्रीवाद ..........२४
- डॉ. बी. जी. जोगदंड
» स्त्रीवादी चळवळीची सामाजिक स्थिती..........२७
- प्रा. डॉ. रंजना हेमराज लाड
» जामनेर तालुक्यातील गोसावी व जोशी जमातीतील महिलांचे शिक्षण व महिला सबलीकरणातील समस्या व उपाय ..........३१
- प्रा. डॉ. संजय बामनराव भोळे
» शालेय अभ्यासक्रमात जीवन कौशल्यांचा समावेश : काळाची गरज ..........३३
- डॉ कविता साळुंके
- कु. ज्योती लष्करी
» लीजन्सी टु डॉ. आंबेडकर अँज् फादर ऑफ इंडियन डेमाक्रॉसी..........३६
- प्रा. डॉ दिलीप तुकाराम कदम
» स्त्रीवाद व स्त्रीवादाचे विविध दृष्टीकोण ..........३८
- प्रा. डॉ. संदिप बी. नेरकर
» पर्यावरण प्रदूषणाचा मानवी समाजावर होणारा परिणाम : एक सामाजशास्त्रीय अभ्यास..........४२
- प्रा. डॉ. मधुकर आत्माराम देसले
» प्रादेशिकवाद आणि भारताची राष्ट्र सुरक्षा ..........४७
- प्रा. डॉ. आर. एस. पवार
» ग्रामीण विकासात शेती आधारित उद्योगाची भूमिका ..........५०
- प्रा. डॉ. प्रशांत ब्रिजलाल सोनवणे
» भारतीय राजकारणातील बदलते प्रवाह..........५५
- प्रा. डॉ. माधव केरबा वाघमारे
» जागतिकीरणाचे साहित्यात उमटलेले साद-पडसाद..........५७
- ज्योती शरद इंगळे
» डिजीटल पेमेंट पद्धत आणि ग्रामीण भारत ..........५८
- डॉ. प्रविण काशिनाथ पाटील
» पर्यावरण समस्या, उपाय आणि शाश्वत विकास ..........६१
- प्रा. डॉ. भारती प्रमोद गायकवाड
» पंचायतराज संस्था आणि महिला सशक्तिकरण ..........६४
- डॉ. प्रा. विजय साहेबराव तुंटे
- सोनवणे रघुनाथ कौतिक
» पर्यावरणीय समस्या : शिक्षकाची भूमिका..........६६
- प्रा. डॉ. पंकजकुमार शांताराम नन्नवरे



Scanned with CamScanner

# जामनेर तालुक्यातील गोसावी व जोशी जमातीतील महिलांचे शिक्षण व महिला सवलीकरणातील समस्या व उपाय

– प्रा. डॉ. संजय वामनराव भोळे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, अप्पासाहेब र. भा. गरूड कला, वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय, शेंदुर्णी, ता. जामनेर, जि. जळगांव, महाराष्ट्र

**प्रस्तावणा**

भारतीय लोकशाही व्यवस्थेमध्ये लोक हा महत्वाचा घटक आहे.त्या अनुषंगाने भारतातील सर्व जाती धर्मातील लोकांना या लोकशाही राजकीय प्रक्रियेत सहभाग मिळावा व सहभाग प्रधान लोकशाही निर्माण व्हावी हा उद्देश भारतीय राज्यघटनाकारांचा होता. म्हणूनच स्वातंत्र्यानंतर भारतामध्ये लोक कल्याणकारी राज्यव्यवस्था म्हणून लोकशाहीकडे बघीतले गेले. व सर्वच जाती-धर्मातील लोकांना समान हक्क व अधिकार देण्यात आले. परंतु स्वातंत्र्याच्या ७० वर्षाच्या प्रदिर्घ अशा कालखंडात राजकीय, सामाजिक, आर्थिक अशा पातळीवर प्रचंड मोठी विषमतेची दरी निर्माण झाली आहे.त्याचे कारण शोधने ही काळाची गरज झाली आहे. त्याच अनुषंगाने प्रस्तुत शोध निबंधामध्ये जोशी व गोसावी या भटक्या जमातीचा पंचायतराजच्या माध्यमातुन किती राजकीय सहभाग आहे तसेच या जमातीतील महिलांचे शैक्षणीक प्रमाण कसे आहे आणि त्याचा परिणाम महिला सबलीकरणावर किती प्रमाणात होतो याचा आढावा प्रस्तुत शोध निबंधामध्ये घेऊन त्यावर उपाय योजना सुचविण्याचा व कल्याणकारी व्यवस्थेत त्यांचा किती विकास झाला आहे. याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

१९६२ साली महाराष्ट्रात पंचायतराजच्या माध्यमातून एक विकास पर्वाला सुरूवात केली गेली व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना देखील योग्य असे आरक्षण सुचविण्यात आले.३३ टक्के आरक्षणाच्या माध्यमातून स्त्री सबलीकरण सुरू झाले.पुढे १९९३ साली ७३ व ७४ वी घटनादुरूस्ती करून महिलांना या पंचायतराज व्यवस्थेमध्ये ५० टक्के आरक्षण देण्याचा प्रयत्न झाला. परंतु आजही वास्तविक पातळीवर स्त्रियांच्या हक्क व अधिकाराचा विचार केला जात नसल्यामुळे आजही स्त्रीयांचा म्हणावा तसा राजकारणात सहभाग दिसत नाही.म्हणून महिला सबलीकरणासाठी शिक्षण हा घटक देखील महत्वाचा असल्याचे जाणवते याच अनुषंगाने जामनेर तालुक्यातील गोसावी व जोशी या भटक्या जमातीच्या महीलांच्या सबलीकरणाचा विचार करता असे स्पष्ट करता येते की भटक्या पद्धतीचे जीवन जगणाऱ्या या समाजाला राजकीय पातळीवर फारसे स्थान नसते त्यामुळे आजही या समाजातील महीला त्यांच्या हक्क अधिकारापासुन वंचीत आहेत आणि त्यामुळे त्यांचे सबलीकरण होतांना दिसत नाही. यामध्ये शिक्षण हा घटक महत्वाचा गृहीत धरूण प्रस्तुत शोध निबंधाचे लेखन करण्यात आले आहे.

**शोध निबंधाची उद्दीष्टे**

१. गोसावी व जोशी जमातीतील महिलांचा पंचायतराज मधील सहभाग व शैक्षणीक प्रमाण याचा शोध घेणे
२. शैक्षणीक समस्या व महिलासबलीकरण यांचा कार्यकारण भाव स्पष्ट करणे.
३. महिलासबलीकरणात शिक्षणाचे महत्व स्पष्ट करणे.
४. गोसावी व जोशी जमातीतील महीलांचा पंचायतराज मधील राजकीय सहभाग स्पष्ट करणे.
५. महिलासबलीकरणाची वास्तव परिस्थीती व महीला सबलीकरणातील या समाजातील अडचणीचा विचार करणे.
६. पंचायत राज मधील गोसावी व जोशी समाजाचे प्रमाण वाढविण्यासाठी उपाय सूचविणे.

**महिला सबलीकरण व गोसावी व जोशी समाज यांचे पंचायतराज व्यवस्थेतील प्रमाण व समस्या**

पंचायतराज व्यवस्थेच्या माध्यमातून महीलांचे सबलीकरण व्हावे हा उद्देश महाराष्ट्र शासनाचा असल्यामुळे तशा प्रकारची व्यवस्था ३३ टक्के आरक्षणाच्या माध्यमातून सुरूवातीला करण्यात आली आणि महिलांना राजकीय पातळीवर योग्य प्रकारची संधी मिळावी अशी व्यवस्था प्रत्यक्षात रूजविण्याचा प्रयत्न झाला.परंतु आजही महिलासबलीकरणाचा विचार करता सर्वच पातळीवर महिलांचा फारसा सहभाग दिसुन येत नाही त्याच अनुषंगाने पंचायतराजमध्ये महिलांचे असणारे प्रमाण अत्यंत अल्प असल्याचे दिसुन येते.

जामनेर तालुक्यातील गोसावी व जोशी समाजातील स्त्रियांचे प्रमाण ४००० च्या जवळ आहे.परंतु या समाजातील स्त्रियांचा मात्र पंचायतराज मध्ये फारसा सहभाग दिसत नाही. त्याची वास्तवता लक्षात घेतली तर असे स्पष्ट होते की आजही या समाजामध्ये अज्ञान, दारिद्र्य व महत्वाचा घटक म्हणजे या समाजामध्ये शिक्षणाचा अभाव आहे. त्यामुळे या समाजातील स्त्रियांना हक्क व अधिकार कळत नाहीत आणि याचा परिणाम त्यांच्या सबलीकरणावर होतो. त्याअनुषंगाने प्रस्तुत शोध निबंधामध्ये याजमातीतील महिलांच्या राजकीय सहभागाच्या व शिक्षणाच्या प्रमुख समस्या कोणत्या आहेत याचा आढावा महिलासबलीकरणासाठी घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**महिला सबलीकरणातील गोसावी व जोशी जमातीच्या अडचणी/समस्या**

**१. अस्थिर जीवनपद्धती व शिक्षणाला दुय्यम स्थान –** स्वातंत्र्यानंतर आजही गोसावी व जोशी समाजातील ९० टक्के लोकभटक्या पद्धतीचे जीवन जगतात त्यामुळे उदरनिर्वाह हा घटक त्यांच्यासाठी महत्वाचा असल्यामुळे ते लोक आपल्या रोजगाराला अधिक प्राधान्य देतात व शिक्षणाला दुय्यम स्थान देतात.त्यामुळे त्यांना आपल्या हक्क व अधिकाराची जाणीव होत नाही म्हणूनच राजकारणाकडील कल सुद्धा अत्यंत कमी दिसतो.म्हणून त्याचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष परिणाम महिलासबलीकरणावर होतो हे वास्तव चित्र



Scanned with CamScanner

आजच्या लोकशाही व्यवस्थेमध्ये आहे.

**२. अज्ञान व शिक्षण अभाव** – अनेक वर्षापासून भटकंती करून जीवन जगणारा हा समाज शिक्षणासाठी फार पुढे आला नाही. त्यामुळे त्यासमाजातील स्त्रि–पुरूषांना इतर समाजाच्या बरोबरीचे स्थान आजही मिळू शकले नाही कारण गोसावी व जोशी जमात ही मुळातच उपेक्षीत व उपऱ्यापद्धतीचे जीवन जगणारी असल्यामुळे अज्ञान हा घटक देखील त्यांच्या जीवनपद्धतीचा एक भाग झालेला आहे. त्यातुनच राजकीय उदासीनता व महिलांच्या प्रती अल्प स्वातंत्र्य दिसून येते त्यामुळे महिलांचे सबलीकरण २१ व्या शतकात सर्वांगीन घटकाचा विकास झालेला असतांनाही फारसे होतांना दिसून येत नाही.

**३. परंपरेचा पगडा** – भटक्या पद्धतीने जीवन जगणे व परंपरेला अधिक महत्व देणे यामुळे शिक्षणाकडे दुर्लक्ष होत गेले आणि त्याचा परिणाम राजकीय हक्कावर झाला तसेच अल्पवयात मुलींचे लग्न अशा घटनामुळे जामनेर तालुक्यातील गोसावी व जोशी समाजातील स्त्रिया ह्या आपल्या परंपरेपेक्षा इतर घटकाला महत्व देत नाहीत.त्यामुळे त्यांना राजकीय अधिकार व सत्तेपासून कायमचे अलिप्त राहावे लागते. याचा परिणाम या समाजातील महीलांच्या सबलीकरणात झालेला दिसून येतो. आणि राजकीय पातळीवर सत्तेमध्ये असणारा समानतेचा भाग हा बाजुला राहुन केवळ चूल आणी मुल एवढेच मर्यादीत स्त्रियांचे क्षेत्र दिसून येते.

**४. पुरूष प्रधान संस्कृतीचे वर्चस्व** – भारतातील स्त्रीवादी चळवळीचा विचार करता आज संपूर्ण समाजातील स्त्रिया आपल्या हक्क व अधिकारासाठी लढतांना दिसत आहेत. कारण पुरूष प्रधान संस्कृतीने स्त्रियांचे हक्क एक प्रकारचे हिरावून घेतल्याचे दिसत आहेत. आज पुरूष प्रधान संस्कृतीचा पगडा गोसावी व जोशी समाजातील कुटूंब व्यवस्थेवर असल्यामुळे या समाजातील स्त्रिया ह्या चुल आणि मूल एवढ्यावर समाधान मानतात. त्यामुळे त्यांच्यावर मोठ्या प्रमाणात अन्याय होतांना दिसतो.याचा परिणाम आपल्या हक्क व अधिकारासाठी स्त्रिया पुढाकार घेतांना दिसत नाहीत.

**५. जातीय पातळीवर असमानतेची वागणूक** – आजही महाराष्ट्रात गोसावी व जोशी समाजातील स्त्रि–पुरूषांना निम्म लेखले जाते. त्यांचा सन्मान होत नाही.त्यामुळे गावपातळीवर त्यांना राजकीय सहभाग मिळत नाही.अशा उपहासात्मक पद्धतीने जीवन जगणाऱ्या या समाजातील स्त्रिया ह्या राजकीय हक्कापासून व महिला सबलीकरणापासून वंचीत असल्याचे जाणवते.

**६. शासकीय व प्रशासकीय पातळीवर उपेक्षा** – स्वातंत्र्यानंतर ७० वर्ष होत असतांना सुद्धा आज या भटक्या जमातील लोकांची शासन दरबारी नोंद नसते विकासात्मक योजना त्यांना दिल्या जात नाहीत. राजकारण,शिक्षण,नोकरी यापासून यांना अलिप्त जीवन जगावे लागते. ही वास्तव परिस्थीती मा.बाळकृष्ण रेणके (मा.अध्यक्ष- अखिल भारतीय भटका समाज आयोग) यांनी त्यांच्या लेखणातून स्पष्ट केली आहे.

**महीला सबलीकरणासाठी उपाय**

१. गोसावी व जोशी जमातीतील स्त्रियांना शिक्षणाबद्दल जाणीव निर्माण करून देणे.
२. शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून देणे व त्यातून महीला अधिकाराची जाणिव निर्माण करून देणे.
३. शासन दरबारी आवश्यक सुविधांची तरतु... त्या–त्या समाजातील स्त्रियांपर्यंत पोहचविणे.
४. पंचायतराज मध्ये स्त्रियांना असणाऱ्या अधिक... जाणीव करून देणे.
५. शासकीय पातळीवर मिळणारी अन्यायात्मक ... थांबविणे.
६. स्त्रियांना रोजगाराची संधी उपलब्ध करूण देणे.
७. स्त्रि-पुरूष समता कायद्याने निर्माण करून जमातीतील जाचक रूढी व परंपरा नष्ट करणे.
८. पुरूष प्रधान संस्कृतीचे वर्चस्व कमी करणे व स्त्रि... त्यांचे स्वातंत्र्य उपलब्ध करून देणे.

**निष्कर्ष**

अशा रितीने प्रस्तुत शोध निबंधाच्या माध्यमातून असे स्पष्ट ... येते की महाराष्ट्रात पंचायत राज व्यवस्था राजकीय विकेंद्रीकरण... व स्त्रि–पुरुष विषमता कमी करून महिलासबलीकरणासाठी राबवि... आली असे असली तरी जेव्हा महिलासबलीकरणाचा विचार के... जातो तेव्हा स्त्रियांच्या बाबतीत मात्र त्यांच्या वाट्याला सामाजि... राजकीय, शासकीय व कौटूंबीक पातळीवर उपेक्षाच आलेली ... असे दिसून येते तेव्हा या सर्व परिस्थीतीला सर्वात महत्वाचा घ... म्हणजे शिक्षण आहे त्यामुळे सर्वात अगोदर शैक्षणीक पातळ... महिलांचे सबलीकरण होणे व महिलांमध्ये शैक्षणीक घटकाची प्र... जाणीव होणे ही काळाची खरी गरज आहे.कारण अशा विष... मुलक रचणेमुळे स्त्रियांना त्यांच्या सर्वांगीण प्रगतीपासून अलिप्त... जगावे लागते म्हणूनच अशा प्रकारची रचना बदलली पाहीजे त्या... महिलांनी देखील आपल्या हक्क व अधिकारासाठी पुढाकार घे... लढणे आवश्यक आहे असे झाले तरच भारताचा व महाराष्ट्राचा ख... अर्थाने समतोल विकास होईल. व पंडीत नेहरू, डॉ.बाबासा... आंबेडकर यांनी विचार व्यक्त केल्याप्रमाणे जोपर्यंत महिलांचा वि... होत नाही तोपर्यंत त्यादेशाची खरी प्रगती मोजता येत नाही. ... विचाराला खऱ्या अर्थाने पुर्णत्व येईल.

**संदर्भ**


१. डॉ.शुभांगी राठी, महाराष्ट्रातील सामाजिक राजकीय चळ... व प्रशासन,अथर्व पब्लीकेशन जळगांव, प्रथम आवृत्ती
२. डॉ.रेखा वानखेडे (संपादक) ० घ्हू ेम्ज्त्हढ ीम्प् व्दत न्दत न्द.०३/२०११/घ्ेल न्द.३/घ्ू-अम-२०११
३. डॉ.संजय भोळे,जामनेर तालुक्यातील भटक्या जमातीत ... जामातीचे राजकीय आणि शैक्षणीक प्रमाण समस्या व उ... (०९ ऑक्टोंबर २०१२)
४. रामनाथ नामदेव चव्हाण, भटक्या विमूक्तांचे अंतरंग,सु... प्रकाशन पुणे,२०१३
५. प्रा.एल.जी सोनवणे, एकनाथ महाराजांची निवड... भारूडे,प्रशांत पब्लीकेशन जळगांव,सप्टेंबर २०१२
६. श्री.तेजराव जोशी,मुलाखत दिनांक २८/२/२०१८
७. श्री.विलास जोशी,मुलाखत दिनांक २८/२/२०१८
८. वामनराव मापारी,अध्यक्ष–महाराष्ट्र जोशी समाज, मुलाखत दिनांक २०/२/२०१८




Scanned with CamScanner

Pankaj Kala Mahavidyalaya, Chopda in collaboration with North Maharashtra University, Jalgaon organized one day Interdisciplinary National Conference on "Recent Trends In Humanities". The research articles received from the scholars are published in this journal. In this conference, scholars will discuss on Impact of Globalization, Multiculturalism, Feminism, Changing Trends in Politics and National security, Indian Economy Structure and Environmental Issues etc. The Conference will be highly intellectual and the interaction between the researchers will help to share their views regarding to recent trends in humanities.

Printed by

Prashant

**Prashant Publications**

3, Pratap Nagar, Sant Dnyaneshwar Mandir Road, Near Nutan Maratha Mahavidyalaya, Jalgaon.
*Website:* www.prashantpublications.com *Email:* prashantpublication.jal@gmail.com
*Ph:* 0257-2235520, 2232800, 9665626717, 9421636460

Scanned with CamScanner